Seva Pravesh

85

जिल्हा परिषद, धुळे
विभाग
6 NOV 1993

क्रमांक एसीटी २०२३/[illegible]/सीआर ५५२/९३
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: २० ऑक्टोबर १९९३

29 OCT 1993

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद सातारा

विषय:- एकात्मिक बाल विकास सेवा योजनांतर्गत पर्यवेक्षिका पदावर पदोन्नती देण्याबाबत.

वरील विषयाबाबतचे आपले क्रमांक ग्रापं २[२]/सीआर २४/कावि ३९२/, दि. १५.५.९२ चे पत्र कृपया पहावे.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा [सेवा प्रवेश] नियम, १९६७ मध्ये माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण व ३ वर्षे सेवा झालेल्या आणि मुख्यसेविका या पदासाठी विहित केलेली अर्हताकारी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या किंवा माध्यमिक शालांत परीक्षा अनुत्तीर्ण व ७ वर्षे सेवा झालेल्या आणि मुख्य सेविका या पदासाठी विहित केलेली अर्हताकारी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या ग्राम सेविकांना मुख्यसेविका/पर्यवेक्षिका [आयसीडीएस] या पदावर पदोन्नती देण्याची तरतुद आहे.

जिल्हा परिषदांच्या मुख्य सेविकांसाठी आणि मुख्यसेविका पदावर पदोन्नतीसाठी प्रशिक्षण व परीक्षा या विभागाच्या क्रमांक प्रशिक्षण १७८४/प्र. १११/०९ दि. ९.११.८४ च्या शासन निर्णयान्वये विहित केली आहे.

मुख्य सेविका/पर्यवेक्षिका [आयसीडीएस] या पदाच्या सेवाप्रवेश नियमात बदल करण्याचे विचाराधीन असल्यामुळे, माध्यमिक शालांत परीक्षा अनुत्तीर्ण व ७ वर्षे सेवा झालेल्या ग्राम सेविकांना सेवाजेष्ठतेनुसार सदर परीक्षा पदोन्नतीच्या दिनांका-पासून दोन वर्षांत उत्तीर्ण होण्याच्या अटीवर या विभागाच्या क्रमांक एसीटी ३०९०/ प्र.क्र. ८८०/१३, दि. ३०.१०.९० च्या आदेशान्वये पदोन्नती देण्याबाबत आदेश दिले होते. दि. ३१.१०.९० च्या आदेश या विभागाच्या क्रमांक एसीटी ३०९०/प्र.क्र. ८८०/ १३, दि. ३०.१०.९१ च्या आदेशान्वये रद्द करण्यात आला होता.

मांजरी जिल्हा पुणे व सिंदेवाही, जिल्हा चंद्रपूर येथील ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्राच्या गृहशास्त्र शाखा बंद करण्यात आल्यामुळे दि. ९.११.८४ च्या शासन निर्णया-न्वये विहित केलेल्या ग्राम सेविका मुख्यसेविका यांच्या प्रशिक्षणाची व प्रशिक्षणांती घ्यावयाच्या परीक्षेची व्यवस्था करण्याच्या सूचना संचालक, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, कोकण भवन, नवी मुंबई यांना या विभागाच्या क्रमांक परीक्षा १३९१/ प्र. ४६२[३] ०९, दि. २३.१२.९१ च्या पत्रान्वये देण्यात आल्या आहेत.

दि. २०.१.८६ च्या अधिसूचनेन्वये मुख्यसेविका व इतर काही संवर्गातील पदावर पदोन्नतीसाठी विहित केलेली अर्हताकारी परीक्षा अद्याप शासनाकडून घेण्यात

=२=

आलेली नाही त्याचप्रमाणे दि. ९.११.८४ च्या शासन निर्णयान्वये जिल्हा परिषदांच्या मुख्यसेविकांसाठी व मुख्यसेविका पदावर पदोन्नतीसाठी विहित करण्यात आलेली प्रशिक्षण व परीक्षा अद्याप झालेली नाही. त्यामुळे मुख्यसेविका पदासाठी विहित केलेली अर्हताकारी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या ग्राम सेविका पदोन्नतीसाठी उपलब्ध होणार नाही त्यामुळे मुख्य सेविका पदासाठी विहित केलेली अर्हताकारी परीक्षा उत्तीर्ण असण्याची अट शिथिल करून ग्रामसेविकांना पर्यवेक्षिका [आयसीडीएस] पदावर पदोन्नती देण्याचा विचार करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा [सेवाप्रवेश] नियम १९६७ मधील नियम ५[२] नुसार अशा प्रत्येक प्रकरणामध्ये जिल्हा सेवेतील पदावर नेमणुकीसाठी विहित करण्यात आलेल्या सर्व अर्हता किंवा त्यापैकी कोणतीही अर्हता कोणत्याही व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या वर्गाच्या संबंधात शिथिल करण्यास विभागीय आयुक्त. नियुक्ती प्राधिकाऱ्यास परवानगी देऊ शकतील, पर्यवेक्षिका [आयसीडीएस या पदावर पदोन्नती देण्यासाठी ग्राम सेविका साठी मुख्यसेविका पदासाठी विहित केलेली अर्हताकारी परीक्षा उत्तीर्ण असण्याची अट [पहिल्यांदा परीक्षा होईपर्यंत ] शिथिल करण्यासाठी स्वयंस्पष्ट प्रस्ताव आपण विभागीय आयुक्तांकडे मान्यतेसाठी पाठवावा. जर विभागीय आयुक्तांनी या प्रस्तावास मान्यता दिल्यास मुख्यसेविका पदासाठी विहित केलेली अर्हताकारी परीक्षा उत्तीर्ण नसलेल्या ग्राम सेविकांना पर्यवेक्षिका [आयसीडीएस] या पदावर सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती देण्याची कार्यवाही आपणास करता येईल.

[चं. म. अलेगांव]
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीसाठी अग्रेषित.
१] विभागीय आयुक्त.
२] मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद [सातारा वगळून]
३] संचालक, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, कोकण भवन, नवी मुंबई
४] कार्यासन क्रमांक ०९, १२ व १५ ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२